महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

जुलै २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✸ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७९४/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

जुलै २०२५



## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन सप्ताहाचे उद्घाटन संपन्न





**दि. १४ जुलै, २०२५.** पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणुन महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. ना.श्री. बाबासाहेब पाटील उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्याचे गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. ना. श्री. शेखरजी मुंदडा व पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. तुषार पवार होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे कृषि आयुक्त श्री. सुरज मांढरे (भाप्रसे), महाराष्ट्र राज्याचे कृषि शिक्षण व संशोधन परिषद महासंचालक श्रीमती वर्षा लड्ढा (भाप्रसे), विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सात्ताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कणखरे उपस्थित होते.

याप्रसंगी मा. कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे मार्गदर्शन करतांना म्हणाले की गोपालन, पशुपालन हे अनादी काळापासून सुरू आहे. परंतु ते लोप पावू नये म्हणून महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेले प्रयत्न अतिशय कौतुकास्पद आहेत. सहकार मंत्री मा.ना.श्री. बाबासाहेब पाटील म्हणाले की हिंदू संस्कृतीत गाईला फार महत्त्वाचे स्थान आहे. देशी गाईंचे जतन व संवर्धन करण्याचा संकल्प सर्वांनी केला पाहिजे. कृषि विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेकडे वळतात परंतु त्यांनी कृषि क्षेत्रात संशोधन करून शेतकऱ्यांना उपयोगी ठरेल असे तंत्रज्ञान विकसित करावे. यांत्रिकीकरणामुळे शेती जीवंत राहत नाही. शेतीतील कार्बनचे प्रमाण वाढले गेले पाहिजे. अधिक रासायनिक खतांचा वापर केल्यामुळे त्याचे दुरगामी दुष्परिणाम दिसून येत आहेत. हे टाळण्यासाठी शेतीमध्ये सेंद्रिय खताचा वापर वाढवला पाहिजे आणि म्हणूनच देशी गाईच्या संवर्धनाकडे अधिक लक्ष द्यावे लागेल.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख म्हणाले की सन १९५०–६० या कालखंडात देशाचे अन्नधान्य उत्पादन १७ मे.टन होते. आज देश अन्नधान्य उत्पन्नात स्वयंपूर्ण आहे. ही मोठी क्रांती आहे. दूध उत्पादनाच्या बाबतीत सुद्धा महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर आहे. प्रति मानसी दुधाची आवश्यक उपलब्धता ३०० ग्रॅम प्रतिदिन इतकी आहे. काही राज्यात ती एक लिटर पेक्षा जास्त आहे. तर महाराष्ट्रात ते ३३५ ग्रॅम प्रतिदिन इतकी आहे. महाराष्ट्राचे प्रतिदिन दूध उत्पादन जवळपास दोन कोटी लिटर इतके आहे. त्यामध्ये देशी गाईचा वाटा फक्त १० टक्के आहे. हा वाटा वाढवण्यासाठी सर्व पातळीवरती प्रयत्न केले गेले पाहिजेत. त्यासाठी देशी गाईचे महत्त्व लक्षात घेऊन सेंद्रिय दूध उत्पादन वाढीसाठी देशी गाई संवर्धन अधिक महत्त्वाचे आहे. देशी गाई संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून देशपातळीवरती खऱ्या अर्थाने एक दिशादर्शक असा प्रकल्प देशी गाईच्या प्रचार व प्रसारणासाठी नक्कीच चालनादायी ठरणार आहे म्हणून अशाच प्रकारचे प्रकल्प महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठांमध्ये सुरू करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डॉ. धीरज कणखरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

देशातील पहिले देशी गायींसाठीचे सेंटर ऑफ एक्सलन्स व गो पर्यटन केंद्र स्थापन करण्यासाठी सन २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. ना. श्री. अजित पवार यांनी रुपये ७१ कोटींची भरीव तरतूद उपलब्ध करून दिली आहे. या केंद्रामध्ये देशी

गाईंचे संवर्धन करून दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रमुख ५ जाती साहिवाल, गीर, राठी, थारपारकर, लाल सिंधी व महाराष्ट्रातील शेतकाम, ओढकाम व दुहेरी उद्देशासाठी असलेल्या ६ जाती खिल्लार, देवणी, डांगी, लाल कांधारी, कोंकण कपिला, गवळाऊ तसेच देशातील सर्वात छोटी गाय पुंगनूर अशा एकूण १२ प्रकारच्या देशी गाईंच्या जातींचे संवर्धन व तुलनात्मक अभ्यास केला जात आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मृणाल अजोतीकर यांनी केले तर आभार डॉ. महानंद माने यांनी मानले. या कार्यक्रमास शेतकरी, महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे देशी गोवंश जतन व संवर्धन दिन संपन्न



**दि २२ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने पहिल्या देशी गोवंश जतन व संवर्धन दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक विकास व औकाफ, क्रीडा व युवक कल्याण, मंत्री मा. ना. श्री. दत्तात्रेय भरणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष मा. ना. श्री. अण्णा बनसोडे, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष व राज्यमंत्री मा. ना. श्री. शेखर मुंदडा, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे उपाध्यक्ष मा. श्री. तुषार पवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना मा. ना. श्री. दत्तात्रेय भरणे म्हणाले की, आपल्या देशामध्ये पूर्वापार शेती ही गाईंच्या शेणाचा व गोमूत्राचा वापर करून व दूध व दुधापासून मिळणाऱ्या उत्पन्नातून होत होती. दुधाचे उत्पादन हे शेतकऱ्यांसाठी एक वरदान होते. मुलांच्या आहारात दुधाचा समावेश कटाक्षाने केला जायचा. आपण स्वतः शेतकरी कुटुंबातील असून लहानपणी प्रत्येक दिवसाची सुरुवात गायीच्या ताज्या दुधाने होत असल्याची आठवण त्यांनी यावेळी बोलून दाखवली. परंतु भारतामध्ये हरितक्रांतीबरोबरच धवलक्रांती होताना मोठ्या प्रमाणात संकरित गायींची पैदास आपल्या देशामध्ये करण्यात आली आणि त्यामुळे आपल्या देशातील मुख्य अशा गोवंशाचे प्रमाण खूपच कमी झाले. शेतीतील शाश्वत उत्पादनासाठी देशी गोवंशाचे जतन व संवर्धन ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून देशी गायींवर होत असलेले संशोधन हे नक्कीच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित असणारे मा. ना. श्री. अण्णा बनसोडे उपाध्यक्ष म्हणाले की महाराष्ट्रामध्ये देशी गाईच्या संशोधनाचे कार्य महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये सुरू आहे आणि ते सर्व समजून घेताना मला आनंद होत आहे. देशी गोवंशाचे महत्व लक्षात घेता देशामध्ये काटक व रोगप्रतिकारक क्षमता असलेल्या देशी गाईंच्या जातींचे संवर्धन व जतन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने देशी गाईला राज्यमाता – गोमाता म्हणून घोषित केले आहे आणि याचाच परिपाक म्हणून दिनांक २२ जुलै हा दिवस देशी गोवंश जतन व संवर्धन दिवस म्हणून साजरा करत आहोत.

यावेळी मा. ना. श्री. शेखर मुंदडा आपल्या भाषणात म्हणाले की देशी गोवंश जतन व संवर्धन सप्ताह खऱ्या अर्थानं साजरा

वर्ष :५५, अंक क्रं. : ५५, जुलै २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

करण्यामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने घेतलेला पुढाकार हा फार महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना होऊन दोन वर्षे पूर्ण झालेली आहेत. गोशाळा निवारे बांधण्यासाठी १५ ते २५ लाख रुपयांचे अनुदान दिले जात आहे. दिनांक ३० एप्रिल हा दिवस गोमय मूल्यवर्धन विक्रम दिन म्हणून साजरा केला जात आहे. मागील दोन वर्षात खऱ्या अर्थाने गोवंश संवर्धनाचे सकारात्मक कार्य करण्यात येत आहे. त्यासाठी एक दूरदृष्टीचे उद्दिष्ट ठेवून गोसंगोपन, गोसंवर्धन, गोसंरक्षण, गोमूल्यवर्धन, गोपालन आधारित शेती, गोसाक्षरता, गोपर्यटन अशा अनेक विषयांवरती कार्य सुरू आहे. महाराष्ट्र शासनाने प्रत्येक गोशाळांमधील गाईंचे टॅगिंग केलेले आहे. एकूण १०६८ गोशाळांपैकी ९६० गोशाळा नोंदणीकृत आहेत. आपल्या देशामध्ये जवळजवळ ८० टक्के गावठी गायी आहेत आणि फक्त २० टक्के गायी या शुद्ध देशी गोवंश असलेल्या आहेत. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपण शुद्ध गोवंशांच्या कालवडी जन्माला घालणं गरजेचं आहे. या संशोधन केंद्रामार्फत आत्तापर्यंत अश्या अनेक कालवडी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून जन्माला आलेल्या आहेत ही बाब भूषणावह आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस देशी गोवंश यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी केल्या जाणाऱ्या विविध प्रयत्नांचे व राजकीय धोरण विशद करणारी चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कु. स्वरांजली स्मिता, रवींद्र लाड या बालगोपालिकेने देशी गोवंशाचे जतन व संवर्धनाचे महत्त्व विशद करणारे गीत सादर केले. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्रामध्ये देशी गोवंशाचे जतन व संवर्धनाचे भरीव काम केलेल्या निवडक गोपालक शेतकरी बांधवांचा देखील सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री. जनार्दन चव्हाण, धायरी, पुणे (देवणी गोवंश), श्री. जितेंद्र मुरकुटे, भोसरी, पुणे (राठी गोवंश), श्री. दीपक पत्की, पौड रोड, पुणे (कांक्रेज, गीर, सहिवाल, कोकण कपिला, राठी गोवंश), श्री. मिलिंद ठोंबरे, बावधन, पुणे (राठी गोवंश), श्री. रामचंद्र ढेबे, टेकपवळे, ता. राजगड, जि. पुणे (कोकण कपिला गोवंश), श्री. सचिन ताम्हाणे, आसू, ता. फलटण, जि. सातारा (सहीवाल गोवंश), श्री. सुनील हरपुडे, कर्जत, जि. रायगड (हरियाणी गोवंश), श्री. रतन भोसले, धामणी, ता. इगतपुरी, जि. नाशिक (डांगी गोवंश), श्री. यशवंत खैरे, वाखरी, ता. दौंड, जि. पुणे (गीर, थारपारकर, पुंगनूर, सहिवाल, कांक्रेज, राठी, नेल्लोर गोवंश), श्री. नंदू चौधरी, केडगाव, ता. दौंड, जि. पुणे (लाल कंधारी गोवंश), श्री. विठ्ठल जगताप, आंबळे, ता. पुरंदर, जि. पुणे (थारपारकर, खिलार गोवंश), श्री. संदीप बोदगे, निघोज, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर (खिलार गोवंश व बैलगाडा शर्यतीची पुन्हा सुरुवात), श्री. रवींद्र लाड, शुक्रवार पेठ, पुणे (पुंगनूर, सहिवाल गोवंश), श्री. किरण जाधव व श्री. हेमंत चौधरी, धायरी, ता. हवेली, जि. पुणे (खिलार गोवंश), श्री. राजेंद्र अथणे, सलगरे, ता. मिरज, जि. सांगली (गीर गोवंश), श्री. विपुल कृष्णा अष्टेकर, आष्टी, ता. परतूर, जि. जालना (गीर गोवंश), श्री. प्रकाश बाफना, राहू, ता. दौंड, जि. पुणे (गीर, सहिवाल गोवंश व देशी गोवंश संवर्धनासाठी भृण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर), श्री. मिलिंद देवल, पुणे (देशी गोवंशांच्या गोशाळांची उभारणी) यांना गौरविण्यात आले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने दिनांक १४ जुलै ते दिनांक २२ जुलै या दरम्यान देशी गोवंश जतन व संवर्धन सप्ताहाचे आयोजन केले होते. या सप्ताहादरम्यान देशी गोवंशामध्ये काम केलेल्या तज्ञ शास्त्रज्ञांची व्याख्याने तसेच देशी गोवंश या संकल्पनेवर आधारित वक्तृत्व, रांगोळी, कविता, पोवाडा, व्हिडिओ रील बनविणे, पोस्टर बनविणे, अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे देखील आयोजन केले होते. त्याचप्रमाणे सप्ताहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील बक्षीस पात्र स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. पुणे शहर व परिसरातील नागरिक व विद्यार्थी आणि देशी गोवंश तसेच गोपालन व दुग्ध व्यवसायाशी संबंधित अनेक जण मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते. या दोन्ही उपक्रमांना पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि फेडरल बँक यांचे प्रायोजकत्व लाभले होते. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये डॉ. संदीप पोळ, डॉ. सुजित भालेराव, डॉ. विकास भालेराव, डॉ. मृणाल अजोतीकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार डॉ. महानंद माने यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. मृणाल अजोतीकर यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात वनमहोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा

**दि. ८ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मध्यवर्ती परिसरामध्ये महाराष्ट्र शासनाच्या हिरवे आणि शाश्वत महाराष्ट्र या धोरणानुसार वनमहोत्सव-२०२५ वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठात डॉ. प्रशांत बोडके,





वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे, आंतरविद्याशाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले व कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की या वनमहोत्सवामध्ये शासनाच्या हिरवे आणि शाश्वत महाराष्ट्र या धोरणानुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात ५० हजाराच्यावर वृक्षरोपण करण्यात येणार आहे. वृक्षलागवड केल्याने पर्यावरणातील हवा शुध्द होते, मातीची धुप थांबते, पाणी अडल्यामुळे जमिनीतील पाणी पातळी वाढते, वातावरणातील तापमान कमी होते, जैवविविधता वाढते. यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मदत होते. यासाठी वृक्षलागवड करणे महत्वाचे आहे. प्रस्ताविक करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की आज मध्यवर्ती परिसरातील उद्यानविद्या विभागांतर्गत टेकडी ब्लॉकमध्ये ५५० व बियाणे विभागाच्या ब प्रक्षेत्रावर ८५० आंबा झाडांची लागवड करण्यात आली आहे. कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वनमहोत्सव सुरु झाल्यापासून आत्तापर्यंत ५,५६,००० वृक्ष लागवड झालेली आहे. यावर्षीच्या वनमहोत्सवात वृक्षरोपणाची संख्या धरुन ६,०६,००० च्या वर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये लागवड झालेली आहे. विद्यापीठातील मध्यवर्ती परिसरात या वनमहोत्सावात १५,००० वृक्षांच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातंर्गत वनमहोत्सव कार्यक्रमाचे आयोजन





**दि. ३ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठांतर्गत असलेल्या डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागांतर्गत वनमहोत्सव २०२५ आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात

आले. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, डॉ. विक्रम कड, डॉ. विरेंद्र बारई, सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की जैवविविधता जपण्यासाठी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. वृक्षारोपणामुळे मातीची धूप थांबून पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. यामुळे जमिनीतील पाणी पातळी वाढते. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. रविंद्र बनसोड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रास्ताविक करतांना डॉ. सचिन नांदगुडे म्हणाले की या पाणलोट क्षेत्राचा परिसर १२०० हेक्टरचा आहे. या १२०० हेक्टरवर पाणी साचवून ठेवण्यासाठी खोल सलग समतल चर, बंदिस्त वाफे, नाला बंडींग करण्यात आलेले असून त्यामुळे या क्षेत्रात १२३.४० टी.सी.एम. पाणी अडवले व जमिनीत मुरवले जात आहे. या पाणलोट क्षेत्रामध्ये यावर्षीच्या वनमहोत्सवात एक हजार झाडांची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये ६०० बांबू व आवळा, जांभूळ व आंबा या ४०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे स्वागत व आभार डॉ. विरेंद्र बारई यांनी केले. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी, विद्यार्थी यांनी वृक्षारोपण केले. हा कार्यक्रम घडवून आणण्यामध्ये डॉ. संगिता शिंदे, श्री. सुनील साळुंके, श्री. संतोष कहार, श्री. राहुल राजपुत व श्री. ज्ञानेश्वर मोरे यांनी परिश्रम घेतले.

## कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे पाण्याचा कार्यक्षम वापर व कीडनियंत्रण या विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दि. ९ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेनुसार विद्यापीठाचे तंत्रज्ञान व शिफारशींचा अवलंब शेतकऱ्यांच्या शेतावर व्हावा या उद्देशाने विद्यापीठातील आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागामार्फत मार्गदर्शन केले जाते. यामध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान, पीक उत्पादनवाढी संदर्भातील विद्यापीठाने केलेल्या शिफारशी यांचे मार्गदर्शन केले जाते. यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर पीक प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. या कार्यक्रमानुसार राहुरी व श्रीरामपूर तालुक्यातील संपर्क शेतकऱ्यांना आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील व कृषि किटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जलसिंचन व्यवस्थापन विभागातील प्रशिक्षण अधिकारी श्री. दादासाहेब धोंडे आणि कृषि किटकशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका डॉ. पल्लवी पाळंदे तसेच संशोधन सहयोगी श्री. विनोद पवार यांनी श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव, मातापूर, खोकर, भोकर, कारेगाव आणि माळवडगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी दिल्या.

यावेळी प्रशिक्षण अधिकारी श्री. दादासाहेब धोंडे यांनी खरीप हंगामातील पिके व त्यांना वापरण्यात येणाऱ्या विविध सिंचन प्रणालींची जोडणी, वापर व देखभाल याविषयी मार्गदशन केले. त्याचप्रमाणे जमिनी क्षारपड होण्यापासून टाळण्यासाठी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याविषयी मार्गदर्शक सूचना केल्या. या भेटीदरम्यान किटकशास्त्रज्ञ डॉ. पल्लवी पाळंदे यांनी खरीपातील पिके सोयाबीन, कापूस, आले, वांगी, इत्यादी पिकांची पाहणी करून पिकावर आलेल्या रोग व किडनियंत्रणाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वांगी पिकात व सोयाबीन

पिकात नव्यानेच आढळून आलेल्या सुत्रकृमी रोगाने ग्रस्त झालेल्या झाडांचे नमुने प्रयोगशाळेत घेवून सदर सुत्रकृमींच्या नियंत्रणाबाबत मार्गदर्शक उपाययोजना सुचविल्या.उपस्थित शेतकऱ्यांच्यावतीने श्री. बापूसाहेब उंडे यांनी विद्यापीठाच्या या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले. या प्रक्षेत्र भेटीसाठी कृषि सहायक श्री. शेषराव देशमुख व श्री. आदिनाथ सूर्यवंशी यांनी नियोजन केले. या प्रक्षेत्र भेटीसाठी जलसिंचन व्यवस्थापन विभागातील डॉ. देविदास खेडकर व डॉ. सुभाष घोडके यांचे सहकार्य लाभले.

## विविध संशोधन केंद्र, तंत्र विद्यालय, कृषि महाविद्यालयांना मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या भेटी

### मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे भेट







**दि. ६ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व गणेशखिंड येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर यांनी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे भेट दिली. यावेळी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, ऊस शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, अ.भा.स.स. प्रकल्पाचे ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे, ऊस बेणे विक्री अधिकारी डॉ. दत्तात्रय थोरवे, वरीष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. माधवी शेळके व कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. किरणकुमार ओंबासे उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की समुह विकास पध्दतीने एक गाव एक ऊस वाण या संकल्पनेद्वारे ऊसाचे एकरी १०० टन उत्पादन वाढविण्यासाठी ऊस संशोधन केंद्रामार्फत प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये शिफारशीत ऊस उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सभासद, कृषि विज्ञान केंद्र, प्रगतशील शेतकरी व साखर कारखाने यांच्या शेतावर एकरी १०० टन आद्यरेखीय प्रात्यक्षिके घेवून ऊस उत्पादनात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ऊस उत्पादन तंत्रज्ञानाची शिफारशीत माहिती डिजीटल तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी ३ मिनिटांचे छोटे व्हीडीओ तयार करून

विद्यापीठाद्वारे विकसीत करण्यात येणाऱ्या युट्युब चॅनलद्वारे प्रसारीत करण्यात यावे. यामुळे विद्यापीठाचे ऊस उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की या ऊस संशोधन केंद्राद्वारे विकसीत वाणांखालील क्षेत्र व ऊस उत्पादन तंत्रज्ञान शिफारशीमुळे राज्यातील सहकारी व खाजगी कारखान्यांना व शेतकऱ्यांना आर्थिक फायदा झालेला आहे. यावेळी डॉ. राजेंद्र भिलारे यांनी ऊस संशोधन केंद्राच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या १७ वाणांची माहिती देवून या वाणांचे देशासाठी आणि राज्यासाठी असलेले योगदान याविषयी माहिती दिली. यावेळी सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागामध्ये चालू असलेल्या तांत्रिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. या भेटीदरम्यान कुलगुरुंनी विविध विभागामध्ये चालू असलेल्या तांत्रिक कार्यक्रमांचा आढावा घेतला. प्रक्षेत्रावर संशोधन केंद्राद्वारे विकसित ऊस व सोयाबीन वाणांचे मुलभूत प्लॉट तसेच विविध विभागाच्या ऊस संशोधन प्रयोगांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या भेटीनिमित्त सर्व मान्यवरांच्या हस्ते आंबा व चिंच झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी संशोधन केंद्रावर कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी केले तर आभार डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी मानले.

## मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी दिली गणेशखिंड येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राला भेट







**दि. ७ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेश खिंड, पुणे येथे भेट देऊन तेथील संशोधन कार्य व विकास कामांचा आढावा घेतला. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विभागीय संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर, डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. मिलिंद देशमुख, डॉ. नजीमुद्दीन शेख, डॉ. सतीश जाधव, डॉ. ज्योती यादव, डॉ.सुनील लोहाटे, डॉ. भीमराव गोंधळी व इतर शास्त्रज्ञ उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की गणेशखिंड येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे कार्य हे गौरवशाली आहे. या केंद्राने १९२७ साली पेरूच्या सरदार या वाणाची निर्मिती केली. हे वाण अजूनही शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. या

केंद्रामध्ये पपई पिकातील संशोधनाचे काम प्रगतीपथावर असून या संशोधन केंद्राने लिची व परदेशी आंबा या पिकांचे लागवड तंत्रज्ञान तसेच नवीन वाण विकासासाठी प्रयत्न करावेत. डॉ. विठ्ठल शिर्के यावेळी म्हणाले की या संशोधन केंद्रात सुरू असलेल्या रोपवाटिकेमध्ये फळे व भाजीपाला कलम रोपांबरोबरच शहरवासीयांची निकड लक्षात घेऊन शोभिवंत रोपांची निर्मिती मोठ्या प्रमाणात करावी. तसेच त्याचे विक्रीचे नवीन दालन मुख्य रस्त्यालगत सुरू करावे. यावेळी डॉ. सुभाष भालेकर यांनी केंद्राचे कार्य व सुरू असलेल्या संशोधन कार्याचा गोषवारा सादर केला. या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. गडाख यांनी केंद्रावरील विविध संशोधन प्रकल्पांना भेट देऊन तेथील शास्त्रज्ञांकडून सुरू असलेल्या विविध प्रयोगांची पाहणी केली व मार्गदर्शन केले. संशोधन प्रकल्पांबरोबरच येथे कार्यरत असलेल्या रोपवाटिका आणि जैविक विविधता केंद्रासही त्यांनी भेट दिली. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

## जाधववाडी येथील अंजीर सिताफळ संशोधन केंद्रास मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची भेट





**दि. ६ जुलै, २०२५.** अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी भेट दिली. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के तसेच सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर उपस्थित होते. डॉ. भालेकर यांनी मा. कुलगुरू तसेच संशोधन संचालक यांचे स्वागत केले. संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे यांनी संशोधन प्रकल्पाची सद्यस्थिती व सुरू असलेल्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले. प्रक्षेत्र भेटीदरम्यान डॉ. शरद गडाख यांनी प्रकल्पात सुरु असलेल्या संशोधन कार्याचा आढावा घेतला व प्रयोगांची पाहणी केली. तसेच त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जैविक व अजैविक ताण सहन करणाऱ्या अंजीर आणि सिताफळ या फळपिकांच्या जातींबाबत तसेच दुर्मिळ व दुर्लक्षित होत चाललेल्या कोरडवाहू फळपिकांचे संवर्धन आणि त्यावर संशोधन होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. संशोधन करताना शेतकरी व ग्राहक वर्गाच्या प्रतिसादाकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. भेटीदरम्यान त्यांनी सुरु असलेल्या संशोधन कार्याबद्दल समाधान व्यक्त केले व प्रभावी संशोधनासाठी मौलिक सुचना केल्या. भेटीच्या समारोपावेळी डॉ. युवराज बालगुडे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. सुनील नाळे व श्री संदीप लिंभोरे उपस्थित होते.

## वडगाव मावळ येथील कृषि संशोधन केंद्राला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची भेट

**दि. ५ जुलै २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी वडगाव मावळ येथील कृषि संशोधन केंद्रास भेट दिली. यावेळी कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. तुकाराम भोर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पाचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर उपस्थित होते.

यावेळी वडगाव मावळ येथील संशोधन केंद्रातून विकसित झालेले फुले कोलम, फुले मावळ–७, फुले मावळ–८ या नवीन वाणांचा प्रसार करण्यासाठी, या वाणांचे मोठ्या प्रमाणावर बिजोत्पादन करून, बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे मा. कुलगुरु डॉ. शरद

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२५

वर्ष :५५, अंक क्रं. : ५५, जुलै २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी






गडाख यांनी निर्देश दिले. तसेच इंद्रायणी या वाणाला करपा रोगप्रतिकारक व सुवासिक असा पर्यायी वाण विकसित करण्यासाठी संशोधनावर भर देण्याकरिता सुचविले. नवीन वाणाची निर्मिती करताना, जलद संकरीकरण कार्यक्रम (Speed Breeding) राबवुन, कमी वेळेत वाण निर्मिती करून शेतकऱ्यांना बारीक दाणे असेलेले, लांबट दाणे असलेले, लवकर तयार होणारे, कीड रोगास प्रतिकारक असलेले व अधिक उत्पादन देणारे, असे विविध प्रकारचे वाण शेतकऱ्यांसाठी विकसित करावेत यासाठीच्या सूचना दिल्या. या भेटी दरम्यान मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी संशोधन केंद्रातील विविध संशोधन प्रकल्पांचा व कार्याचा आढावा घेतला व संशोधन केंद्राच्या विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच संशोधन केंद्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. तुकाराम भोर यांनी कृषि संशोधन केंद्रातील विविध संशोधन प्रकल्प व भात बिजोत्पादन कार्यक्रम याविषयी सादरीकरण केले. डॉ. विठ्ठल शिर्के यांनी संशोधन केंद्राचे विकासासाठी आवश्यक प्रस्ताव पाठविणेसाठी सूचित केले. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नंदुरबार कृषि महाविद्यालयाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची भेट





**दि. ३० जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी भेट दिली. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु.बी. होले यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी प्रा. संदीप राजपूत, प्रा. दिनेश सूर्यवंशी, महविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक आधारित ज्ञानाद्वारे अनुभव आधारित शिक्षण प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवा. महाविद्यालयात उच्चपदस्थ अधिकारी, व्याख्याते याचे विद्यार्थांना मार्गदर्शन द्या व विद्यार्थांची गुणवत्ता वाढवा. नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयात विद्यार्थांची क्षमता ओळखून सुरवातीपासूनच विद्यार्थांचे चार मंच तयार करा व विद्यार्थांना स्पर्धा

परीक्षा, उद्योजक, उच्च तंत्रज्ञान आधारित शेती व परदेशातील नोकरीच्या विविध संधीबाबत माहिती उपलब्ध करून द्या अशा सूचना उपस्थितांना दिल्या. ते पुढे म्हणाले कि विद्यार्थांसाठी व्यावसायिक तत्वावर अनुभव आधारित शिक्षण प्रकल्प तयार करा व फिरता निधीद्वारे कृषि विद्यापीठाचे महसुली उत्पादन वाढवा. बाह्यश्रोत निधीसाठी प्रस्ताव तयार करून निधी मिळवा याद्वारे कृषि विद्यापीठे आत्मनिर्भर होणेसाठी मदत होईल. कमवा व शिका या तत्वावर महाविद्यालयातील गरीब विद्यार्थांना रोजगार उपलबद्ध करून द्या. दर वर्षी कृषि महाविद्यालयात खरीप व रब्बी हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व विद्यार्थांच्या पालकांना निमंत्रित करून प्रक्षेत्र दिवस साजरा करा. या माध्यमातून कृषि विद्यापीठाचे नवीन तंत्रज्ञान आदिवासी पाड्यापर्यंत पोहचवा असे प्रतिपादन केले. यादरम्यान डॉ. गडाख यांनी महाविद्यालयाच्या विविध विभागांना व प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष भेट देवून मार्गदर्शन केले तसेच प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी डॉ. यु. बी. होले यांनी महाविद्यालयाचे मागील पाच वर्षांचे शैक्षणिक, प्रक्षेत्र, आस्थापना, राबविण्यात येणारे विविध प्रकल्प, इत्यादी कामाच्या प्रगतीविषयी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार डॉ. प्रेमसिंग गिरासे यांनी मानले.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत कृषि दिन उत्साहात साजरा





**दि. १ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्प व महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि दिनाचे औचित्य साधुन भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम गावातील शेतकऱ्यांबरोबर सुसंवाद व प्रक्षेत्र भेटी कार्यक्रमाचे आयोजन मौजे तांभेरे येथे करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सचिन सदाफळ तसेच प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, तांभेरे गावचे सरपंच श्री. सागर मुसमाडे, तांभेरे गावचे कृषि सहायक श्री. प्रतीक ठाकरे, प्रगतशील शेतकरी मेजर ताराचंद गागरे, श्री. सुनील पंजाबी, श्री. महेश गागरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की माजी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक हे राज्याच्या हरितक्रांतीचे जनक असून त्यांच्या कार्यकाळातच राज्यातील चार कृषि विद्यापीठांची स्थापना झाली. त्यांचे कृषि क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांचा जन्मदिन आपण कृषि दिन म्हणुन साजरा करत आहोत. कै. वसंतराव नाईक हे हरितक्रांतीचे व कृषि विद्यापीठांचे शिल्पकार आहेत. यावेळी डॉ. ससाणे मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले की शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत विद्यापीठाने विकसीत केलेले एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल या गावांसाठी आदर्शवत ठरत आहे. एकात्मिक शेती पध्दतीच्या मॉडेलचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अवलंब करावा असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सचिन सदाफळ यांनी केले तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले. वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या श्री. महेश गागरे, श्री. शुभम मुसमाडे व मेजर ताराचंद गागरे यांच्या सोयाबीन पीक प्रात्यक्षिकांना मान्यवरांनी भेटी दिल्या. तसेच कनगर येथील श्री. प्रवीण गाडे यांच्या सोयाबीन पीक प्रात्यक्षिकाला भेट देण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री. विजय शेडगे व श्री. राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२५



## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे रब्बी ज्वारीचे दोन सुधारित वाण राष्ट्रीय स्तरावर प्रसारीत






**दि. ३० जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या नेतृत्वाखाली, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाने महात्मा फुले कृषि विद्यापीठातील ज्वारी सुधार प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विजू अमोलिक आणि त्यांच्या सहकारी शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नाने रब्बी ज्वारीचे एस. पी. व्ही. २९१९ व एस. पी. व्ही. २७५१ हे दोन वाण राष्ट्रीय स्तरावर निवड समितीकडून प्रसारीत करण्यात आले आहे. रब्बी ज्वारीवर भाकृअप–भारतीय श्री अन्न संशोधन संस्था, हैद्राबाद येथे नुकतेच राष्ट्रीय स्तरावरची ज्वारीची वार्षीक आढावा बैठक संपन्न झाली. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कृषिशास्त्र विभागाचे उपमहासंचालक डॉ. डी. के. यादव उपस्थित होते. याप्रसंगी देशभरातील शास्त्रज्ञ उपस्थित होते. यावेळी या सर्वांच्या उपस्थितीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले एस. पी. व्ही. २९१९ व एस. पी. व्ही. २७५१ हे दोन वाण राष्ट्रीय स्तरावर प्रसारीत करण्यात आले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित ज्वारी सुधार प्रकल्प राज्यातील रब्बी हंगामामधील ज्वारी संशोधनाचे प्रमुख केंद्र असून येथे ज्वारी पिकाचे संशोधन करुन त्यामधून जमिनीच्या प्रकारानुसार हलक्या, मध्यम व भारी जमिनीसाठी ज्वारीच्या उपपदार्थानुसार व कडबा गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिने नविन वाण विकसित केले जातात. ज्वारी सुधार प्रकल्प येथील प्रक्षेत्रावर रब्बी हंगामामध्ये कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली, भारतीय श्रीअन्न संशोधन संस्था हैद्राबाद (IIMR-Hyderabad) यांचे मार्गदर्शनाखाली ज्वारी पिकाचे विविध प्रयोग घेतले जातात. या संशोधनातून रब्बी ज्वारीचे एस.पी.व्ही. २९१९ व एस. पी. व्ही. २७५१ हे दोन वाण राष्ट्रीय स्तरावर निवड समितीकडून प्रसारित करण्यात आले. त्यापैकी एस.पी.व्ही. २९१९ हा वाण भारी जमिनीसाठी महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या तीन राज्यांमध्ये जिरायत लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. या वाणाचे हेक्टरी उत्पादन २९.२६ क्वि. प्रति हेक्टरी आणि कडब्याचे उत्पादन ८०.५८ क्वि. प्रति हेक्टरी इतके आहे. हा वाण धान्य व कडबा उत्पादनामध्ये उत्कृष्ट असल्याचे निवड समितीच्या निष्कर्षास आले तसेच हा वाण रोग व कीडींसाठी प्रतिकारक आहे. त्याचप्रमाणे एस.पी.व्ही. २७५१ हा वाण हलक्या जमीनीसाठी प्रसारित करण्यात आला

आहे. या वाणाचे हेक्टरी उत्पादन २३.०१ क्वि. प्रति हेक्टरी आणि कडब्याचे उत्पादन ८८.८२ क्वि. प्रति हेक्टरी इतके आहे.

भारतीय श्रीअन्न संशोधन संस्था, हैद्राबाद येथील संचालक डॉ. तारा सत्यवती व प्रकल्प निर्देशक डॉ. आर. मधुसुदन यांचेही या वाणांच्या निर्मितीमध्ये वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. यानिमित्त वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. व्ही. एल. अमोलिक यांनी प्रकल्पात कार्यरत असलेले सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. ज्वारी सुधार प्रकल्पाचे दोन वाण राष्ट्रीय स्तरावर प्रसारीत झाल्याबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी अभिनंदन केले.

## कृषि महाविद्यालय व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा येथे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांची भेट





**दि. ७ जुलै, २०२५.** अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा येथील शासकीय कृषि तंत्र विद्यालयाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांनी भेट दिली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे तसेच कृषि तंत्र विद्यालयाचे कर्मचारी श्री सोमनाथ लंघे, श्री. किशोर भाकरे, श्री. दिनेश पंडित, श्री. अंबादास इंगळे व श्री. सचिन राऊत उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि तंत्र शिक्षण ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एक चांगली संधी आहे. आपल्या देशात आणि राज्यात शेती हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो. विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे शिक्षण घेऊन कौशल्य आत्मसात केल्यास त्यांना शेती आणि शेतीसंलग्न व्यवसायातून उत्तम अर्थप्राप्ती होऊ शकेल. शेती व्यवसायात तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास स्वतःचा शेती निगडीत व्यवसाय स्थापन करुन शेती उत्पादनात व उत्पन्नात निश्चितच वाढ होते. या कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांना येथील कौशल्य आधारीत शिक्षणातून स्वतःचा उद्योग सुरु करणे शक्य आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. पंडित खर्डे यांनी कृषि तंत्र विद्यालयाच्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. प्रशांत बोडके यांनी विद्यार्थी व्याख्यान कक्ष, बीज प्रक्रिया केंद्र तसेच प्रक्षेत्रावरील सोयाबीन बीजोत्पादन प्लॉटला भेट दिली. याप्रसंगी डॉ. बोडके यांच्या शुभहस्ते वनमहोत्सव कार्यक्रम-२०२५ चे औचित्य साधून विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. बोडके यांनी यावेळी कृषि तंत्र विद्यालयाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा येथे विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम संपन्न

**दि. २४ जुलै, २०२५.** पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयात यावर्षी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून या विद्यालयाचे माजी विद्यार्थी सहाय्यक कृषि अधिकारी श्री. राजेश पऱ्हे, कृषि उद्योजक श्री. शंतनू ढमढेरे तसेच खाजगी कंपनीतले अधिकारी श्री. जालिंदर इंगळे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर कृषि तंत्र विद्यालयाचे कृषि सहाय्यक श्री. सोमनाथ लंघे, श्री. किशोर भाकरे,




श्री. दिनेश पंडित, श्री. अंबादास इंगळे, श्री. सचिन राऊत उपस्थित होते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. पंडित खर्डे म्हणाले की विद्यार्थ्यांनी या दोन वर्षाच्या शैक्षणिक कालावधीत कृषिविषयक ज्ञान आणि कौशल्य अवगत करून पुढील भविष्यासाठी वाटचाल करावी. कृषि क्षेत्र हे विस्तीर्ण क्षेत्र असून तरुणांना रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. श्री. पऱ्हे यांनी कृषि तंत्र विद्यालयातील आपले अनुभव सांगून या ठिकाणी मिळालेल्या ज्ञानाच्या शिदोरीवर विद्यार्थ्यांना शासकीय सेवेमार्फत शेतकऱ्यांची सेवा करण्याची चांगली संधी मिळते असे सांगितले. कृषि तंत्र विद्यालयात पदविका प्राप्त झालेला विद्यार्थी हा खऱ्या अर्थाने ग्रामपातळीवर उत्तम कार्य करू शकतो असे त्यांनी सांगितले. श्री. इंगळे म्हणाले की विद्यार्थ्यांनी या ठिकाणी आपल्या शैक्षणिक कालावधीत अधिकाधिक ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रातही भरपूर वाव असल्याचे ते म्हणाले. श्री. ढमढेरे यांनी आपल्या कृषि उद्योगाची यशोगाथा विशद केली. यावेळी श्री. लंघे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यक्रमाची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे असे सांगितले. श्री. भाकरे आणि श्री. पंडित यांनी विद्यार्थ्यांना होस्टेलचे नियम तसेच प्रक्षेत्राची माहिती दिली. द्वितीय वर्षातील मुलांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा यावेळी गुलाब पुष्प आणि पेन देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. ऋतुजा वाघमारे आणि कु. वैष्णवी गवते यांनी केली.

## पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयात कॅम्पस इंटरव्यूमध्ये अकरा विद्यार्थ्यांची निवड



**दि. २६ जुलै, २०२५.** पुणतांबा येथील शासकीय कृषि तंत्र विद्यालयात कॅम्पस मुलाखतीद्वारे अकरा विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. सातप्पा खरबडे आणि कृषि तंत्र शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली. कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा

येथे नवभारत फर्टीलायझर्स अँड ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेडचे विभागीय प्रमुख श्री. जी. एस. राव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुलाखती घेतल्या. सदर मुलाखतीला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. ३० विद्यार्थ्यांच्या मुलाखतीतून या कंपनीने अकरा विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सर्वप्रथम कंपनीद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा हे नेहमीच विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवत असते. येथे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच शेतीमधील आवश्यक असणाऱ्या विविध कौशल्यांचे ज्ञान मिळते. या कॅम्पस इंटरव्यूमध्ये शैलेश सोनवणे, ओम सिन्नरकर, अजिंक्य टाके, प्रशांत अभंग, सिद्धार्थ अनुभोले, दुर्गेश परहे, शरयू सोनवणे, वेदांत शिंदे, तन्मय कांबळे, प्रवीण खळेकर आणि महेश परे या विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. या मुलाखतीचे आयोजन करण्यासाठी विद्यालयाचे कृषि सहाय्यक श्री. सोमनाथ लंघे, श्री. किशोर भाकरे, श्री. दिनेश पंडित त्याचप्रमाणे श्री. अंबादास इंगळे आणि श्री. सचिन राऊत यांचे सहकार्य लाभले. मुलाखती झाल्यानंतर कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे आणि कंपनीचे विभागीय प्रमुख श्री. जी. एस. राव यांच्या शुभहस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि दिन साजरा





**दि. १ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने कृषि दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन पोलीस अधिक्षक श्री. श्रीकांत धिवर उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. राहुल देसले, डॉ. सुनिल पाटील, डॉ. खुशाल बऱ्हाटे, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. पंकज देवरे, डॉ. प्रशांत पवार, डॉ. विकास पवार, श्री. जितेंद्र सुर्यवंशी, डॉ. संजीव वाडीले, डॉ. रविंद्र सुर्यवंशी, डॉ. चतुर ठाकरे, डॉ. घोडके, डॉ. श्रीकांत बन, डॉ. राखी मेश्राम, डॉ. साखरे व सहाय्यक कुलसचिव श्री. राजाराम महाले उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. बबनराव इल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. श्रीकांत धिवर यांच्या हस्ते वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमात एकूण ८०० रोपांची लागवड महाविद्यालय परिसरात विविध ठिकाणी करण्यात आली. यामध्ये बांबू ४६५, जांभूळ २००, आवळा १००, सीताफळ ५० या सारख्या झाडांचा समावेश होता. या कार्यक्रमानंतर मुख्य प्रवेशव्दार, ग्रंथालय परिसर, बालोद्यान, बाजरा संशोधन केंद्र परिसर व जिमखाना अशा महाविद्यालयाच्या विविध भागात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण मोहिमेमुळे परिसराचे हरितावरण अधिक समृद्ध होणार आहे, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. या उपक्रमाव्दारे केवळ कृषि शिक्षणाबरोबरच पर्यावरण, प्रेम, सामाजिक भान आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न केला गेला. यावेळी कृषि महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा

**दि. २६ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे आणि ३६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी (अल्फा कंपनी) यांच्या संयुक्त विद्यमाने २६ वा कारगिल विजय दिवस मोठ्या देशभक्तीने, अभिमानाने आणि आदरभावनेने डॉ.शिरनामे सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२५
वर्ष :५५, अंक क्रं. : ५५, जुलै २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





माध्यमातून १९९९ च्या कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ३६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल निषाद मंगरुलकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने होते. यावेळी केअर टेकर ऑफिसर डॉ. सुनील जोगदंड, सुभेदार मेजर, नाईक सुभेदार, पीआय स्टाफ व बटालियनचे इतर सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात एनसीसी कॅडेट्सच्या गार्ड ऑफ ऑनरने झाली, ज्यात त्यांनी सन्मानाने मानवंदना दिली. त्यानंतर शहीद जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमात २०२२–२५ बॅचमधील उत्तीर्ण कॅडेट्सना 'C' प्रमाणपत्रांचे वितरण प्रमुख पाहुणे कर्नल मंगरुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कर्नल मंगरुळकर यांनी उपस्थितांना देशभक्ती, शिस्त आणि सेवाभाव या मूल्यांना आयुष्यभर जपण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, शहीद जवानांना खरी आदरांजली म्हणजे आपण आपले जीवन जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे जगणे. त्यांनी सैन्यामधील करिअर संधीबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. महानंद माने यांनी १९९९ च्या कारगिल युद्धाच्या स्मृतीना उजाळा देऊन उपस्थित विद्यार्थ्यांना सैन्यदलातील करिअर संधीमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले. या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग आणि कॅडेट्स यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आभार डॉ. सुनिल जोगदंड यांनी मानले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे कृषि दिन उत्साहात साजरा





**दि. १ जुलै, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांची जयंती १ जुलै रोजी कृषि दिन म्हणून साजरी करण्यात येते. त्यानिमित्त हाळगाव कृषि महाविद्यालयात कृषि दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी

अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन, डॉ. प्रेरणा भोसले उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की कृषि संस्कृतीच्या समृद्धीसाठी तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान व आत्मनिर्भरता निर्माण करण्यासाठी महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेले आधुनिक कृषि तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचवावे. मनुष्य प्राण्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या तीन मुलभूत गरजा आहेत परंतु हवा ही निसर्ग निर्मित गरज आहे. स्वच्छ हवेसाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कमीत कमी ५ रोपे लावावी व त्यांचे संगोपन करावे. दरम्यान महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर सहयोगी अधिष्ठाता यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी कृषि दिनाचे महत्व पटवून दिले. हे महाविद्यालय प्रगती पथावर नेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन डॉ. सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंबादास मेहेत्रे यांनी तर आभार डॉ. प्रणाली ठाकरे यांनी मानले. महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे खरीप पीक संरक्षण मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न





**दि. ११ जुलै, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव, श्री शिवाजी महाराज व पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेतकरी गट, वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड तालुक्यातील वाघा या गावात शेतकऱ्यांसाठी खरीप पीक संरक्षण मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. मनोज गुड, उद्यानविद्यावेत्ता डॉ. संदीप मोरे, कृषि कीटकशास्त्रज्ञ डॉ. धनेश्वर पाटील, शेतकरी गटाचे प्रमुख श्री. गोकुळ बारस्कर, अध्यक्ष श्री. भास्कर बारस्कर, श्री. सचिव महेंद्र बारस्कर, खजिनदार श्री. रामदास बारस्कर, सल्लागार श्री. शहाजी बारस्कर व सभासद श्री. अश्रू मते उपस्थित होते.

यावेळी डॉ. मनोज गुड यांनी मुग, उडीद, तूर, सोयाबीन यावर दिसून येणाऱ्या रोगांचे व्यवस्थापन, डॉ. धनेश्वर पाटील यांनी मुग, उडीद, तूर, सोयाबीन यांवर दिसून येणाऱ्या किडींचे व्यवस्थापन तर डॉ. संदीप मोरे यांनी कांदा लागवड तंत्रज्ञान या विषयांवर शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. खरीप हंगामात मुख्यत्वे लागवड केल्या जाणाऱ्या मुग, उडीद, तूर, सोयाबीन, कांदा पिकांचे रोग व किडींपासून संरक्षण, व्यवस्थापन योग्यरीत्या करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ उत्पादित बियाणे, रोपे, जैविक खते, बुरशीनाशके, सूक्ष्म अन्नद्रवे, कृषिदर्शनी यांची माहिती शेतकऱ्यांना दिली व त्याचा वापर शेतीसाठी करण्यास प्रोत्साहित केले. पीक संरक्षण व व्यवस्थापनासंबंधित शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन महाविद्यालयातील तज्ञांनी केले. सदर कार्यक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी

**दि. २३ जुलै, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १६९ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनावणे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी लोकमान्य बाळ गंगाधर



टिळकांचे प्रेरणादायी विचार व कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले. टिळक हे केवळ नेते नव्हते तर उत्तम शिक्षक, गणिततज्ञ आणि संस्कृत अभ्यासकही होते अशी ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. केसरी आणि मराठा ही वृत्तपत्रे सुरु करून त्यांनी भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत केली. लोकांना एकत्र आणण्यासाठी गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरु केले. स्वातंत्र्यलढ्यात शिक्षणाचे महत्व समजण्यासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्था स्थापन केल्या. लोकमान्य टिळक हे खऱ्या अर्थाने लोकनायक होते. त्याग, धैर्य आणि देशप्रेम यासाठी आजही प्रत्येक भारतीयांमध्ये ते एक आदर्श आहेत असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ऊस लागवड तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरण प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. ३० जुलै, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे अखिल भारतीय समन्वयीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी व कृषि महाविद्यालय, हाळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस लागवड तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय समन्वयीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, जामखेडचे तालुका कृषि अधिकारी श्री. रवींद्र घुले, प्रगतशील शेतकरी डॉ. दिपक वाळूंजकर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. रवींद्र बनसोड म्हणाले की शेतीमध्ये आव्हाने खूप आहेत. आजच्या काळात दिवसेंदिवस बदलत चाललेल्या हवामानाला तोंड देणे अवघड होत चालले आहे. परंतु शेतकरी बांधवांनी न डगमगता या आव्हानांचे रुपांतर संधीमध्ये करावे. कृषि यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून जागतिक हवामान बदलावर आपण मात करू शकतो. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना

डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की हे महाविद्यालय तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी कटिबध्द आहे. शेतीला यांत्रिकीकरणाची जोड गरजेची असल्याने या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे महाविद्यालय विक्री केंद्र सुरु करणार आहे. यामध्ये बियाणे, जैविक खते, कीटकनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, विविध प्रकाशने या केंद्रावर उपलब्ध होतील असे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी केले. श्री. रवींद्र घुले यांनी शासनाच्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या यांत्रिकीकरणाच्या विविध योजनांची माहिती दिली. डॉ. दिपक वाळूंजकर यांनी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आभार मानले. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी मफुकृवि विकसित आधुनिक कृषि अवजारे व यंत्रे, डॉ. अंबादास मेहेत्रे यांनी ऊस लागवड तंत्रज्ञान, डॉ. रविकिरण राठोड यांनी ऊस शेतीसाठी उपयुक्त यांत्रिकीकरण, प्रा. महेश पाचारणे यांनी ड्रोन–ऊस शेतीसाठी वरदान, डॉ. संजय भांगरे यांनी खोडवा ऊस व्यवस्थापनाकरीता उपयुक्त यांत्रिकीकरण, डॉ. अनिकेत गायकवाड यांनी सूक्ष्म अन्नद्रव्ये फुले मायक्रो ग्रेड या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर प्रगतशील शेतकरी श्री. प्रद्युम्न महाजन यांनी ड्रोनबाबत मार्गदर्शन करून फवारणीचे प्रात्यक्षिक दाखविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेश पाचारणे यांनी तर आभार डॉ. निकिता धाडगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ७५ शेतकरी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे कृषि दिन व शेतकरी मेळावा संपन्न



**दि. १ जुलै, २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीप्रित्यर्थ कृषि दिनाच्या निमित्ताने राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाच्या कृषि विस्तार व संज्ञापन विभाग आणि ग्रामपंचायत तारदाळ यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे तारदाळ येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अशोक पिसाळ होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन तारदाळचे सरपंच सौ. पल्लवी पोवार उपस्थित होत्या. यावेळी विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. भारत कोलगणे, किटकशास्त्रज्ञ डॉ. अभयकुमार बागडे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. रविंद्र कारंडे, सहायक प्राध्यापक डॉ. महेद्र यादव, तारदाळ गावचे प्रगतिशील शेतकरी श्री. बाबासो महाजन, बळीराज्य मंडळ प्रमुख व सह. दुध. व्यव. संस्थेचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश भगत दत्त उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. अशोक पिसाळ म्हणाले की दिवसेंदिवस बदलत असलेल्या हवामान, पावसाचे कमीअधिक प्रमाण यादृष्टीने वेगवेगळे नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंबन करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर शेती या प्रमुख व्यवसायापासून जास्तीत जास्त कसे उत्पादन वाढवता येईल याबद्दलचे योग्य असे मार्गदर्शन केले. यावेळी सौ. पल्लवी पोवार म्हणाले की कृषि महाविद्यालयाच्या शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने शिफारशीत उत्पादन तंत्राचा वापर केल्यास नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होऊ शकेल त्यासाठी त्यांनी या शास्त्रज्ञांच्या नियमित संपर्कात राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी डॉ. अभयकुमार बागडे यांनी वेगेवेगळ्या पिकांवरती येण्याऱ्या कीडी व त्याचे जैविक व रासायनिक पद्धतीने नियंत्रण कसे करावे याबद्दलचे योग्य असे मार्गदर्शन केले. डॉ. रविंद्र कारंडे यांनी दिवसंदिवस विविध

पिकांवर रोग, रोगग्रस्त पिके, त्यावर नियंत्रण आणि शेतकऱ्यांनी खात्रीशीर व प्रमाणित नर्सरीमधील रोपे वापरावीत, पेरणीपुर्वी बीजप्रक्रिया कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. महेंद्र यादव यांनी जनावरांचे संगोपन, काळजी व निगा याबदल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भारत कोलगणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप पाटील यांनी तर आभार श्री. यासीन मुजावर यांनी मानले. या शेतकरी मेळाव्याच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे श्री. बाबुराव आवळे, श्री. राजेंद्र जांभळे यांनी परिश्रम घेतले. या शेतकरी मेळाव्यास तारदाळ व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर अंतर्गत कृषि तंत्रज्ञान सप्ताहांतर्गत शेतकरी मेळावा संपन्न





**दि. ३ जुलै, २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयातंर्गत कृषि विस्तार व संज्ञापन विभागाच्या आणि कृषि विभाग, गारगोटी यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे वाघापूर, ता. भूदरगड येथे हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषि तंत्रज्ञान सप्ताहांतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अशोक पिसाळ होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य तथा पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषदेचे सदस्य श्री. दत्ताजीराव उगले उपस्थित होते. यावेळी विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. भारत कोलगणे, आखिल भारतीय नाचणी व तत्सम तृणधान्य संशोधन प्रकल्पाचे कनिष्ठ पैदासकार व प्रमुख डॉ. योगेश बन, किटकशास्त्रज्ञ डॉ. अभयकुमार बागडे, वाघापूरचे सरपंच श्री. बापुसो आरडे, मंडळ कृषि अधिकारी श्री. सुनील डवरी, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. बी. डी.पाटील उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. अशोक पिसाळ म्हणाले की सततच्या बदलत्या हवामान व पावसाच्या कमी अधिक प्रमाणामुळे कमी कालावधीत जास्त उत्पादन देणारी पर्यायी पिके शेतकऱ्यांनी निवडावी. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त उत्पादन घ्यावे. यावेळी डॉ. योगेश बन म्हणाले की नाचणी व तत्सम तृणधान्य उत्पादन तंत्रज्ञान यांनी कमी कालावधीत किड व रोगाचे नगन्य प्रादुर्भाव आणि कमीतकमी उत्पादन खर्चात जास्त उत्पन्न देणारे व दुय्यम पिके म्हणून न पाहता त्याचा प्रमुख लागवडीचे पिके असा विचार केल्यास नकीच शेतकऱ्याच्या आर्थिक समृध्दीस चालना मिळेल. यावेळी श्री. दत्ताजीराव उगले मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानाचा उत्पादनातील वापर वाढविण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून जास्तीत जास्त क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञान बसविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. डॉ. अभयकुमार बागडे यांनी सोयाबीन, भात आणि प्रामुख्याने उसातील हुमणी किडीचे एकात्मीक व्यवस्थापन कसे करावे याबद्दलचे मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. भारत कोलगणे प्रास्ताविक करतांना म्हणाले की कृषि विद्यापीठाचे नवनवीन तंत्रज्ञान अवगत होण्यासाठी विद्यापीठाच्या कृषिदर्शनी, श्री सुगी, फुले कृषि वाहिनी ९०.८ यांचा वापर करावा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. संदीप पाटील यांनी मानले. या शेतकरी मेळाव्याच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे विस्तार गट भूदरगडचे कृषि सहाय्यक श्री. सुहास पाटील, श्री. सुरज चौगुले व श्री. राजेंद्र जांभळे यांनी परिश्रम घेतले. या शेतकरी मेळाव्यास वाघापूर व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे हार्टफुलनेस मेडिटेशनचे तीन दिवसीय विशेष शिबिर संपन्न



**दि. ७ जुलै, २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे हार्टफुलनेस संस्था, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय यांच्या संयुक्त आत्मशांती, तणावमुक्त जीवन व अंतर्मनाच्या विकासासाठी हार्टफुलनेस मेडिटेशनचे तीन दिवसीय विशेष शिबीराचे आयोजन जिमखाना विभाग येथे करण्यात आले होते. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अशोक पिसाळ, हार्टफुलनेस संस्थेचे ऑटोमोबाईल इंजिनयर श्री. नितीन भोसले उपस्थित होते. या कार्यक्रमात श्री. नितीन भोसले यांनी ध्यान, प्राणायाम, मनःशांती साधनेचे विविध तंत्र आणि आत्मनिरीक्षण यासंबंधी मार्गदर्शन केले. सहभागींच्या मानसिक समाधानासाठी प्रत्यक्ष ध्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.  या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी ध्यानामुळे मिळणाऱ्या मानसिक शांततेचा अनुभव घेतल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी मनाची शांती आणि सकारात्मक जीवनशैली या विषयावर विशेष व्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ए.बी. देशपांडे, प्रा. एम.बी. गुंड, प्रा. आर.बी. बोरसे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाराष्ट्र कृषि दिन साजरा



**दि. १ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कै. वसंतराव फुलसिंग नाईक यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र कृषि दिन म्हणून साजरा करण्यात आला. कै. वसंतराव नाईक हे महाराष्ट्रातील हरिक्रांती, पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक, महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री होते. त्यानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक काळ राज्यभार सांभाळला. संपूर्ण आयुष्य शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झिजवले. अनेक क्रांतीकारी शेतकरीहिताचे निर्णय त्यांनी घेतले. ज्याप्रमाणे भारतामध्ये गहू आणि भाताची हरितक्रांती झाली त्याचप्रमाणे कै. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रामध्ये ज्वारीची हरितक्रांती

केली. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा सन्मान म्हणून १ जुलै ही त्यांची जयंती कृषि दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला कृषि महाविद्यालयाचे प्रा. नामदेव धुर्वे, डॉ. सागर बंड, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर पाटील, श्री. अशोक पाटील, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. श्रीकांत अरगडे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन आणि सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे यांनी तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे वृक्ष लागवड अभियानांतर्गत बांबूची लागवड






**दि. ३ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र कृषि दिनानिमित्ताने वृक्ष लागवड अभियान सुरू करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुक्ताईनगरचे पोलिस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. रमेश चौधरी, डॉ, गणेश देशमुख, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. सागर बंड, डॉ. कुशल ढाके, डॉ. मनीषा पालवे, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना पोलिस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी वृक्ष लागवडीचे महत्व सांगितले. तसेच कायद्यांची माहिती देतांना विविध कलमे, आयपीसी, गुन्ह्याचा तपास करतांना पाळावयाची पद्धती याबद्दल सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमाची तसेच कै. वसंतराव नाईक यांनी कृषि संबंधित केलेल्या कार्यासंबंधी सर्वांना अवगत केले. मुख्य कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयात यावर्षी वृक्ष लागवड अभियानाअंतर्गत वृक्षारोपणासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या सूचनेनुसार तसेच बांबूचे महत्त्व लक्षात घेऊन टुंड्रा या जातीच्या बांबूची लागवड केली.

वनक्षेत्रपाल श्री. समाधान सोनवणे सामाजिक वनीकरण विभाग, जळगाव यांनी कृषि महाविद्यालयास सुमारे ५००० बांबूची रोपे मोफत उपलब्ध करून दिली. त्यामुळेच कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या संपूर्ण परिसरास टुंड्रा जातीच्या बांबूचे कुंपण (लाईव्ह फेन्सिंग) करण्यात आले. पर्यावरणासंबंधी असलेली जागरूकता आणि वृक्ष लागवडीबाबत असलेली आवड यातून प्रेरणा घेऊन महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी –विद्यार्थिनी यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेऊन बांबूची लागवड केली. याप्रसंगी महाविद्यालयातील श्रीमती सोमानी, श्री. अशोक पाटील, श्री. संतोष गवळी, श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. गणेश गावंडे, श्री. श्रीकांत आरगडे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय पाचरणे यांनी तर आभार डॉ. रियाज शेख यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे आर्थिक जागरूकता कार्यक्रम ऑनलाइन प्रशिक्षण सत्र संपन्न



**दि. १४ जुलै, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे आर्थिक जागरूकता कार्यक्रम ऑनलाइन प्रशिक्षण सत्राचे आयोजन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी भूषविले. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. कमल गलानी यांची ऑनलाइन उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. कमल गलानी यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक कशी टाळावी यावर मार्गदर्शन केले. तसेच बचत आणि गुंतवणूकीची मूलतत्त्वे, वैयक्तिक वित्त व्यवस्थापन, फसव्या योजनांचा शोध, सेबीची गुंतवणूकदार संरक्षण आणि तक्रार निवारण यंत्रणा अश्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनी, अधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी उपस्थिती नोंदविली. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. कुशल ढाके यांनी केले.

## कृषि विज्ञान केंद्रांचे विविध उपक्रम

### कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे किफायतशीर शेळीपालन या विषयावर कौशल्य आधारित प्रशिक्षण संपन्न




**दि. १७ जुलै, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे व आत्मा, धुळे यांचे माध्यमातून पशुपालक यांच्याकरिता दोन दिवसीय किफायतशीर शेळीपालन या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. गिरीश पाटील, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, श्री. जगदीश काथेपुरी, डॉ. अतिश पाटील, डॉ धनराज चौधरी उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. बबनराव इल्हे यांनी शेळी पालनाचे कृषिमधील महत्व, महात्मा फुले कृषि विद्यापीठ

संशोधनाविषयी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी त्यांनी जास्तीत जास्त पशुपालकांनी शेतकरी प्रशिक्षणामध्ये सहभाग नोंदवत शेलीपालनातील शास्त्रीय बाबी तंत्रज्ञान समजून घेवून नियोजन करण्याचे आवाहन करत आपला आर्थिक स्तर उंचावला पाहिजे असे नमूद करत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शनामध्ये डॉ. राहुल देसले यांनी शेळी पालनाची सद्यस्थिती व ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील शेलीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. गिरीश पाटील यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनाविषयी माहिती दिली.

तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. धनराज चौधरी यांनी भारतातील व महाराष्ट्रातील शेळ्यांच्या जाती व त्यांची वैशिष्टे, शेळीपालनाच्या पद्धती, शेळ्यांच्या करडांचे संगोपन व आहार व्यवस्थापन, शेळ्यांची निगा, आहार व्यवस्थापन, नर निगा, आहार व्यवस्थापन, पशु पैदास धोरण, दुध व मांस खरेदी विक्री व्यवस्थापन, विविध शासकीय योजनांची माहिती इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रमोद साखरे यांनी शेळ्यांची निगा, लसीकरण व रोग व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले. चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी डॉ. पंकज पाटील, कु.अमृता राऊत, श्री. रोहित कडू, कु. प्राची काळे, कु. स्वप्नाली कौटे, श्री. स्वप्नील महाजन, श्री. बाळू वाघ, श्री. कुमार भोये, श्री. रमेश शिंदे, श्री. कुणाल राजळे, श्री. जीवन राणे, अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## धुळे येथील कृषि विज्ञान केंद्राला उत्कृष्ट कृषि तंत्रज्ञान विस्तार संस्था सादरीकरणाचा पुरस्कार



**दि. २२ जुलै २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळेला सलग तिसऱ्यांदा उत्कृष्ट कृषि तंत्रज्ञान विस्तार संस्था सादरीकरणाचा पुरस्कार आठव्या विभागीयस्तरीय कृषि विज्ञान केंद्राच्या कार्यशाळेमध्ये अटारी, पुणे झोन– ८ यांचे मार्फत देऊन सन्मानित करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र ४३ वर्षांपासून अविरतपणे विद्यापीठ आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध कृषि व कृषिपूरक संस्थांनी केलेल्या संशोधनाच्या विस्ताराचे काम धुळे जिल्ह्यात शेतकरी प्रथम या निष्ठेने अविरत करत आहे. याचाच परीणाम म्हणून कृषि विज्ञान केंद्राला सन २०२४–२५ चा उत्कृष्ट कृषि तंत्रज्ञान विस्तार संस्था सादरीकरणाचा पुरस्कार मिळाला.

सदर विभागीय कार्यशाळेचे आयोजन अटारी, पुणे झोन– ८ मार्फत गुजरात राज्यातील भुज या ठिकाणी करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा राज्यातील एकूण ८२ कृषि विज्ञान केंद्राचा सहभाग होता. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे विस्तार शिक्षण विभागाचे माजी उपमहासंचालक डॉ. किरण कोकाटे, पश्चिम बंगाल कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम.एम. अधिकारी, बिहार कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. ए.के. सिंघ, पुणे येथील अटारीचे संचालक डॉ. एस.के .रॉय उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात सदरचा पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. दिनेश नांद्रे यांनी स्वीकारला. धुळे येथील कृषि विज्ञान केंद्र महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या व्यापक संकल्पनेतून तसेच विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे आणि पुणे येथील अटारीचे संचालक डॉ. एस.के. रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहे. या कृषि विज्ञान केंद्रात ज्ञान तंत्र प्रणाली (Krishi Vigyan Kendra Knowledge Network Portal) कार्यरत असून या प्रणालीवर मासिक प्रगती अहवाल व दैनदीन कृषि व कृषि पूरक विस्तार कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर या प्रणालीमध्ये अपलोड केले जातात. यामध्ये कृषि विज्ञान केंद्र मागील चार वर्षापासून पहिल्या १० स्थानांमध्ये नियमितपणे काम करीत आहे. सद्यस्थितीमध्ये कृषि विज्ञान केंद्र या यादीत ८ व्या स्थानावर आहे. या KVK पोर्टलवर भारतातील ७२८ कृषि विज्ञान केंद्रांची नोंदणी आहे.

वर्ष :५, अंक क्रं. : ५५, जुलै २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शुद्ध देशी गोवंश व जतन संवर्धन दिन कार्यक्रम उत्साहात साजरा





**दि.२२ जुलै २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि विज्ञान केंद्र, कृषि महाविद्यालय, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन धुळे येथील स्वामीनारायण मंदिराचे प्रमुख परमपूज्य महंत आनंद जीवन स्वामीजी उपस्थित होते. यावेळी आत्मा प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनवणे, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्राध्यापक डॉ.राहुल देसले, प्रभारी कार्यक्रम समन्वयक डॉ.पंकज पाटील, प्रगतशील शेतकरी डॉ. अमित पाटील, श्री. दिलीप पाटील, श्री. धीरज कुमार सोनवणे उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. बबनराव इल्हे यांनी कृषिमधील शास्वत उत्पादनासाठी गोपालनाचे महत्व अधोरेखित करत गोपालनामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ करत असलेल्या संशोधनाची माहिती उपस्थितांना करून दिली. परमपूज्य महंत आनंद जीवन स्वामीजी यांनी अध्यात्मिक दाखले देत गोमाता महत्व विषद करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शनामध्ये डॉ. हितेंद्र सोनवणे व श्री. दिलीप पाटील यांनी नैसर्गिक तथा सेंद्रिय शेतीमध्ये गोधनाचे महत्व सांगितले. डॉ. राहुल देसले यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये गोपालनाचे महत्व अधोरेखित करत मार्गदर्शन केले.

कार्यकमाचे प्रास्ताविक डॉ. पंकज पाटील यांनी केले. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. धनराज चौधरी यांनी देशी गोवंश जतन, संवर्धन, भविष्यातील संधी आणि महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. अमित पाटील यांनी देशी गोवंश निगडीत विविध शासकीय योजनांची माहिती दिली. श्री. धीरजकुमार सोनवणे यांनी स्वानुभव कथन करत देशी गोवंश पालनामध्ये कसे यशस्वी झालो व विविध अडचणीवर मात कश्याप्रकारे केली याची यशोगाथा सांगत उपस्थितांशी संवाद साधला. सदर तांत्रिक कार्यकमानंतर कृषि महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील महाराष्ट्रातील एकमेव लाल सिंधी गोवंश प्रकल्पाला भेट देत गोपूजन व गोपरीक्रमा करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. धनराज चौधरी यांनी तर आभार डॉ. अतिश पाटील यांनी मानले. या कार्यक्रमप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी त्याचबरोबर कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी तसेच कृषि महाविद्यालय, नाशिक, मालेगाव, शहादा महाविद्यालयांचे प्राध्यापक, चतुर्थ वर्षातील डेरी मोडूलचे विद्यार्थी सहभागी होते. तसेच कृषि महाविद्यालय धुळेतील चतुर्थ वर्षातील मॉड्युलचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलअंतर्गत उद्यानदुतांमार्फत शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**दि. २५ जुलै, २०२५.** छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव येथील उद्यानविद्या महाविद्यालयाच्या सातव्या सत्राच्या उद्यानदूतांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव व औद्योगिक संलग्नित कार्यक्रम २०२५–२६ अंतर्गत जळगाव (गा.) गावात शेतकरी बांधवांसाठी शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जळगाव गावच्या सरपंच द्रोपदाबाई मगरे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख



डॉ. एस.पी. सोनवणे उपस्थित होते. यावेळी उपसरपंच श्री. आत्माराम गेंद, कार्यक्रम समन्वयक डॉ. आर. पी. खुळे, वनस्पती रोगशास्त्र विभागाचे विषयतज्ञ डॉ. एच. एन. मारकड, RHWE चे चेअरमन डॉ. डी. आर. बिरारी, RHWE चे सहाय्यक समन्वयक डॉ. आर. एल. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल भुकन, डॉ. शुभांगी देवकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. एस. पी. सोनवणे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. एच. एन. मारकड यांनी डाळिंब पिकावरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन व जैविक कीटकनाशकाची उपयुक्तता या विषयावर, डॉ. पी.बी. तापकीर यांनी कांदा पीक लक्षीत उत्पादन दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन व शेतकऱ्यांच्या अडचणी समजावून घेऊन समाधानकारक उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर.पी. खुळे यांनी केले. श्री. अशोक अहिरे, श्री. सिताराम गेंद, श्री. लक्ष्मण गेंद, श्री. रमेश अहिरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उद्यानदूत–विशाल माळी, जितेंद्र हिरे, ललित हिरे, प्रतिक खांडे, गौरव कुवर, तेजस हिरे, अनिकेत घाटे यांनी अथक प्रयत्न केले.

## क्रीडा

### कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये आंतरमहाविद्यालयीन बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन






**दि. २४ जुलै, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये आंतरमहाविद्यालयीन बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या बुध्दीबळ स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र बुध्दीबळ संघटनेचे सहसचिव श्री. राजेंद्र कोंडे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाचे नियंत्रक श्री. सदाशीव पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भणगे, कृषि यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा विद्यार्थी परिषदेचे

उपाध्यक्ष डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, विद्यापीठ क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के, अहिल्यानगर बुध्दीबळ संघटनेचे सचिव श्री. यशवंत बापट व लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. रविंद्र बनसोड म्हणाले की आंतरराष्ट्रीय पातळीवर बुध्दीबळ स्पर्धेत आपला देश अजिंक्य ठरत आहे. आपल्या देशाचे बुध्दीबळ स्पर्धक विश्वनाथ आनंद, अजिंक्य कुंठे, डी. गुकेश यांनी बुध्दीबळामध्ये देशाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकवले आहे. बुध्दीबळामुळे विद्यार्थ्यांच्या बुध्दीला चालना मिळते, एकाग्रता व संयम वाढतो यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. बुध्दीबळ क्रीडा प्रकार आपल्याला जीवनातील आव्हाणांना संधीत रुपांतरीत करायला शिकवतो. प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. राजेंद्र कोंडे म्हणाले की, बुध्दीबळ स्पर्धेची निर्मिती आपल्या देशात झालेली आहे. या खेळामध्ये रशिया व अमेरिकेचे वचर्स्व होते. आता बुध्दीबळ स्पर्धेत जगात आपले वचर्स्व आहे. आज फिडे विश्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाच्या दिव्या देशमुखने बुध्दीबळ स्पर्धेत अंतिम फेरीत धडक मारली आहे. या अनुषंगाने आज आंतरमहाविद्यालय बुध्दीबळ स्पर्धेचे उद्‌घाटन कौतुकास्पद आहे. या क्रीडा प्रकारामुळे आकलनक्षमता वाढते म्हणुन हा क्रीडा प्रकार शैक्षणीकदृष्ट्या महत्वाचा आहे. या खेळामुळे बौध्दीक मल्ल तयार होतात. महाराष्ट्र बुध्दीबळ संघटना या खेळाला सदैव्य प्रोत्साहन देत आहे व देत राहिल. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन नलावडे यांनी केले. या क्रीडा स्पर्धेमध्ये २९ कृषि महाविद्यालयांचे २९ संघ यामध्ये १३३ मुले व ६५ मुली सहभागी झाले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी केले तर आभार डॉ. विक्रम कड यांनी मानले.

**प्रकाशक** : डॉ. गोरक्ष ससाणे
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : डॉ. सचिन सदाफळ
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : श्री. सुनिल राजमाने
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७९४/२०२५